# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३११ - २३ दिनांक : - १३/०९/२०२३

## Amazon Pay अकाऊंटचा युझर आयडी पासवर्ड घेवून ऑनलाईन फसवणूक रक्कम रु.७९,९९८/- परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नालासोपारा पोस्टे हद्दीतील इसम श्री. दिपक **XXXX** यांनी त्यांचे मोबाईलमधील अनोळखी लिंक क्लिक करुन त्यामध्ये माहिती भरली. त्यानंतर काही दिवसानंतर त्यांचे अमेझॉन पे येथे जतन करून ठेवलेल्या क्रेडीट कार्डवरुन ७९,९९८/- रुपयाची ऑनलाईन शॉपींग झाल्याचे तक्रारदार यांचे निदर्शनास आले. त्यांनी अमेझॉन पे लॉगीन करण्याचा प्रयत्न केला परंतू सदरचा लॉगीन तक्रारदार यांना ॲक्सेस करता येत नसलेबाबत तक्रार सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रार प्राप्त होती.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक – २१२४-बी/२०२३ दि.०९/०९/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत तपशील पडताळणी केला असता **Indusind Bank, Fedral Bank (Credit Card)** द्वारे **Amzon Pay** वरुन **SafeGold** वर शॉपींग केली गेल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व पुन्हा तक्रारदार यांचे मुळ क्रेडीट कार्डवर परत मिळविण्यात आली.

**<u>अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...</u>**

- **Unknown Call/Link/Email विश्वासर्हता पडताळणी केल्याशिवाय कोणतीही माहिती उघड करू नये.**
- **आपले Credit Card ची माहिती ऑनलाईन ॲपमध्ये सेव्ह करू नये**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **अशा फसव्या लिंकवर क्लिक करु नका.**
- **अशा लिंक प्राप्त होताच बँकेसोबत संपर्क साधून पडताळणी करावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा.माधुरी धिंडे, पो.अं. गणेश इलग, प्रविण आव्हाड, म.पो.अं. पल्लवी निकम, अमिना पठाण, सुवर्णा माळी, पो.अं. कुणाल सावळे, प्रशांत बोरकर यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५

सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----